# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

Phone No. 24010437 / 24020781
Visit us at : http://mpcb.gov.in
Email : jdwaterdivision@mpcb.gov.in

Kalptaru Point 2nd floor,
Sion Matunga Scheme Road
No. 8, Infant of Sion Cercal,
Sion (E), Mumbai – 400 022.


"Your Service is our Duty"

No./MPCB/JD(WPC)/ENV/PH/B- 240828-FTS-0028 Date: 28 / 08 / 2024

**To,**
**The Principal Secretary,**
**Environment & Climate Change Department.**
**Government of Maharashtra,**
**Room No. 217 (Annex) New Administration Building,**
**Mantralaya, Mumbai-400032.**

**Sub:** Environmental Clearance - Proceedings of Public Hearing in respect of **Proposed** M/s. Parseoni Manganese Ore Block, Village-Parseoni & Pallora, Taluka-Parseoni, Dist-Nagpur, State – Maharashtra proposed lease area 44 Ha. Production Capacity – 29,737 Tonnes/Annu, **Proposed By** M/s. Universal Impex, 15, Professor Colony, New Yerkheda, Kalmana Road, Kamptee, Dist-Nagpur, Maharashtra.

**Ref:** Sub-Regional Nagpur-I submitted proceeding vide dt-26.07.2024, received on 05.08.2024.

....................

**Sir,**

The Public Hearing for Proposed Establishment of Common Biomedical Waste Treatment & Disposal facility (CBWTF). Proposed by **Proposed** M/s. Parseoni Manganese Ore Block, Village-Parseoni & Pallora, Taluka-Parseoni, Dist-Nagpur, State – Maharashtra proposed lease area 44 Ha. Production Capacity – 29,737 Tonnes/Annu, **Proposed By** M/s. Universal Impex, 15, Professor Colony, New Yerkheda, Kalmana Road, Kamptee, Dist-Nagpur, Maharashtra.

Environmental public hearing Conducted on- 02.07.2024, Time-11.00 A.M. at. project site, Village-Parseoni & Pallora, Taluka-Parseoni, Dist-Nagpur, Maharashtra. The minutes of the public hearing approved and duly signed by the Public hearing panel along with the proceedings are enclosed.

a. Minutes of public hearing duly signed by the Chairman of public hearing panel in (English & Marathi)
b. Copy of Office Order
c. Video DVD and Photograph of Public Hearing.
d. List of participants.
e. Newspaper Notices for Environmental Public Hearing in English & Marathi.

This is submitted for further necessary action please.

**Yours Sincerely,**

**(Dr. Avinash Dhakne IAS),**
**Member Secretary**

**Encl: As above**

**Copy for information & necessary action to:**

1) The Regional Officer, MPCB, Nagpur.
2) The Sub Regional Office, MPCB, Nagpur-I.
3) EIC, M.P. C. Board, Mumbai - For information & display of Minutes on website.

**Copy to the applicant of the project:**

M/s. Universal Impex, 15, Professor Colony, New Yerkheda, Kalmana Road, Kamptee, Dist-Nagpur, Maharashtra.

**मे. पारशिवनी मॅगनीज खाण, गाव-पारशिवनी आणि पालोरा, तालुका-पारशिवनी जिल्हा-नागपुर, राज्य - महाराष्ट्र प्रस्तावित खाण क्षेत्रफळ ४४ हेक्टर, उत्पादन क्षमता – २९,७३७ टन/वर्ष असलेल्या खाण कामासाठी प्रस्तावित मे. युनिव्हर्सल इम्पेक्स, १५, प्राफेसर कॉलनी, नविन येरखेडा, कळमना रोड, कामठी, जिल्हा-नागपुर यांची प्रस्तावित प्रकल्पासंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत....**

---

मे. युनिव्हर्सल इम्पेक्स, १५, प्राफेसर कॉलनी, नविन येरखेडा, कळमना रोड, कामठी, जिल्हा-नागपुर यांची मे. पारशिवनी मॅगनीज खाण, गाव-पारशिवनी आणि पालोरा, तालुका-पारशिवनी जिल्हा-नागपुर, राज्य -महाराष्ट्र प्रस्तावित खाण क्षेत्रफळ ४४ हेक्टर, उत्पादन क्षमता - २९,७३७ टन/वर्ष असलेल्या खाणकामासाठी प्रस्तावित प्रकल्पासंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दि. ०२ जुलै २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थळी - गाव-पालोरा, तालुका-पारशिवनी, जिल्हा-नागपुर येथे संपन्न झाली.

पर्यावरण आघात मुल्याकंन, अधिसुचना दि. १४ सप्टेबर २००६ व २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार जाहिर लोकसुनावणीचे स्थळ, दिंनाक व वेळ, मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांची मंजुरी घेऊन निश्चित करण्यात आली होती.

मंडळाचे मुख्यालयाने पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-२४०६२८-FTS-०२२१ दि. २८/०६/२०२४ अन्वये सदर जाहिर लोकसुनावणी दि. ०२/०७/२०२४ रोजी दुपारी ११.०० वाजता प्रकल्प स्थळी घेण्याबाबत कार्यालयीन आदेश जारी केला होता. **(सहपत्र क्र. १)**

या प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीच्या सुचना मराठी वृत्तपत्र दैनिक लोकमत व इंग्रजी दैनिक वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया मध्ये दि. ०१ जुन २०२४ रोजी प्रसिदध देण्यात आली. **(सहपत्र क्र. २)**

पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीकरीता मा. अनुप खांडे, अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, नागपुर तथा अध्यक्ष, लोकसुनावणी समिती, सौ. हेमा देशपांडे, मा. प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नागपुर तथा सदस्य लोकसुनावणी समिती, श्री. राजेंद्र उ. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र.नि. मंडळ, नागपुर-१ तथा समन्वयक लोक सुनावणी समिती, ग्रामस्थ, सरपंच, पर्यावरण विषयक कार्यरत सेवाभावि संस्था, चॅनलचे प्रतिनिधी, व मोठया संख्येने स्थानिक उपस्थित होते. या बाबतचे हजेरी पट सोबत जोडले आहे. **(सहपत्र क्रं ३)**

**कार्यपध्दती व उद्देश :**

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने सर्वप्रथम श्री. राजेंद्र उ. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नागपुर-१ तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित असलेले ग्रामस्थ, सरपंच, पर्यावरण विषयक कार्यरत सेवाभावि संस्था, चॅनलचे प्रतिनिधी, व उपस्थितांचे हार्दिक स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचे स्वरुप व उददेशाबाबत असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि १४ सप्टेंबर २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार सदरील लोकजाहीर सुनावणी जनतेच्या माहितीसाठी लोकसुनावणीची प्रसिध्दी सुचना दोन वृत्तपत्र जसे मराठी वृत्तपत्र दैनिक लोकमत व इंग्रजी दैनिक वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडीया येथे ३० दिवस आधी दि ०१ जुन २०२४ रोजी देण्यात आली होती. त्यामध्ये प्रस्तावित प्रकल्पाविषयी सुचना, विचार, टिका टिप्पणी, आक्षेप, तोंडी तसेच लेखी स्वरुपात नोंदविण्याचे जनतेला व पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्थांना आवाहन करण्यात आलेले होते.

तसेच प्रस्तावित मे. पारशिवनी मॅगनीज खाण, गाव-पारशिवनी आणि पालोरा तालुका-पारशिवनी जिल्हा-नागपुर, राज्य -महाराष्ट्र प्रस्तावित खाण क्षेत्रफळ ४४ हेक्टर, उत्पादन क्षमता – २९,७३७ टन/वर्ष असलेल्या प्रस्तावित खाण कामासाठी मे. युनिव्हर्सल इम्पेक्स, १५, प्राफेसर कॉलनी, नविन येरखेडा, कळमना रोड, कामठी, जिल्हा-नागपुर यांच्या प्रकल्पासंबंधी पर्यावरणीय व्यवस्थापन आराखडाचा मसुदा, कार्यकारी सारांशच्या प्रती जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी स्थानीक मराठी भाषेत व इंग्रजी भाषेत भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि १४ सप्टेंबर २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार अभ्यासण्याकरीता खालील अधिसूचित स्थानिक कार्यालये व ग्रामपंचायती येथे उपलब्ध करण्यात आले.

१.जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर

२. जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर

३. जिल्हा परिषद, नागपूर

४. उप-विभागीय अधिकारी, पारशिवनी, जि.नागपूर

५. तहसिल कार्यालय, पारशिवनी, ता. पारशिवनी, जि.नागपूर

६. पंचायत समिती, पारशिवनी, ता. पारशिवनी, जि.नागपूर

७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, ५ वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.

८. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.

९. मप्रनि मंडळ (मुख्यालय), सायन सर्कल, सायन (पुर्व), मुंबई-२२.

१०. मुख्याधिकारी, नगर परिषद, पारशिवनी, जि.नागपूर.

११. नगरपंचायत कार्यालय, पारशिवनी, ता. पारशिवनी, जि.नागपूर

१२. ग्रामपंचायत कार्यालय, पालोरा, करंभाळ, डोरली, भागेमाहरी, ता. पारशिवनी, जि.नागपूर

वरील नमुद अधिसुचित शासनाच्या विभागाला देखील त्यांनी त्याच्या स्तरावर सदरहु पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची बाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अश्या प्रकारे जाहीर जनसुनावणी बाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पदधतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्प बाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टिका, टिप्पणी, सुचना व आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोयीचे होईल.

सदरहु जाहिर लोकसुनावणीच्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म. प्र. नि. मंडळ, नागपुर-१ यांना लेखी किंवा ईमेल व्दारे सुचना प्राप्त झालेल्या नाहीत.

सदरील समिती ही फक्त लोकांचे सदरील प्रकल्पाबाबतचे मत नोंदविण्याकरीता असुन कोणालाही निर्णय घेण्याचा अधिकार या समितीस नाही. जनसुनावणीमध्ये उपस्थित मुददयांचा व प्रकल्प धारकांनी दिलेल्या उत्तरास अनुसरुन बैठकिचे इतिवृत्त राज्यस्तरीय आघात मुल्यांकन प्रधिकरण समिती कडे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, मुंबई यांच्या मार्फत सादर करण्यात येईल.

सदरील प्रकल्पाविषयाच्या कोणालाही लेखी निवेदन/सुचना /हरकती घ्यावयाचे असल्यास त्यांनी प्रकल्प धारकांचे सादरीकरण केल्यानंतर आपले नाव, गावाचे नाव सांगुन प्रश्न, सुचना, हरकती, विचारु शकतात या प्रश्न उत्तराच्या कार्यवाहीची नोंद जशीच्या तशी घेऊन या जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त राज्यस्तरीय आघात मुल्यांकन प्राधिकरण समिती कडे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, मुंबई यांच्या मार्फत पाठविण्यात येईल. त्यावर तेथील तज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेतील.

समन्वयक, यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत प्रकल्पा संबंधिची पर्यावरण अनुमतीच्या प्रस्तावाकरीता पर्यावरण विषयक लोकजाहीर सुनावणीची सादरीकरण करण्याची विनंती केली.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पा विषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रमुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

**प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती**

- उपलब्ध मान्यता
- स्थान तपशिल
- स्थळदशर्क नकाशा
- खसरा नकाशा
- प्रकल्पा विषयक वर्णन
- जमिन वापर तपशिल
- भूमि उपयोग वर्णन

- भूमि अधिग्रहन योजना
- १० किमी अभ्यास क्षेत्र नकाशा
- अभ्यास क्षेत्राचा पर्यावरणीय तपशिल
- पर्यावरण विषयक प्राथमिक माहिती
- पर्यावरणीय प्रभाव मुल्यांकन
- पर्यावरण व्यवस्थापन योजना
- प्रस्तावित सामाजिक विकास कार्यक्रम
- अपील

उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नागपुर-१ तथा समन्वयक जनसुनावणी समिती यांनी उपस्थित असलेले प्रकल्प प्रवर्तक/प्रतिनीधी यांना सदरील पर्यावरण विषयक जनसुनावणीचे उद्दीष्ट पुर्ण होण्याकरीता आपले मत, टिका-टिप्पणी, आक्षेप, सुचना/हरकती मांडण्याबाबत आव्हान केले.

## जनसुनावणी नोंद (प्रोसीडींग) :

| अ. क्रं. | उपस्थितांनी उपस्थित केलेले मुद्दे | प्रकल्प प्रवर्तकाने दिलेले उत्तर | जनसुनावणी समितीने दिलेली प्रतिक्रिया सुचना |
|---|---|---|---|
| १ | **श्री. गुरुदयाल कांबळे, उपसरपंच, गाव पालोरा, ता. पारशिवनी, जि. नागपुर यांनी असा मुददा उपस्थित केला की,** ही जी खाण आहे, या खाणी मध्ये पाणी जे जमा होत असते त्या जमा होत असलेल्या पाण्याचा पाझरा होत आहे त्यामुळे आमच्या विहिरीला झरे लागले आहे. आमची ही दैनंदिन नळ योजना आहे. याबाबतची आपण स्पष्टीकरण दयावे की या बाबत काय उपाय योजना आहे. त्यामुळे गावात गढुळ पाणी येते या बाबत काय उपाय योजना आहे.<br><br>व प्रश्न निर्माण केला की, हे जे खाणीचे उत्खनन करणार इथे शेतकरी वर्ग आहे. व इथे सर्व पालोरा लोकांची शेती आहे. त्याच्या त्या पाण्यामुळे जी येण्या जाण्याची वहीवाट आहे त्या वहीवाटीचे नुकसान होईल त्याकरीता त्याची काय उपाय योजना आहे. | **प्रकल्प प्रवर्तकाने यांनी सांगितले की** - हे जे क्षेत्र आहे ४४ हेक्टर आहे तेथे ७ वेगवेगळे पिटस आहे ते ऑलरेडी एक्सीसटिंग पिंटस आहे, त्या एक्सीटिंग पिंटसच्या पाण्याची विचारणा आहे या पिट ला आपण कुठेही टच करत नाही आहे, सध्या हा ५ वर्षाचा प्रकल्प आहे त्या व्यतिरीक्त जो लिज एरीया आहे. त्या लिज एरीया मध्ये मॅगनिजचा डिपॉजिट एरीया आहे त्या मायनिंगच्या डिपॉजिट एरीया बददल ती ३.५ हेक्टर तयार करण्यात येईल. पण या पाण्याला आपण टच करणार नाही.<br>आपण नाही केल ते पहिले पासुन आहे, हे आपल्या क्षेत्रामध्ये आहे आपण संध्या त्याला हात लावणार नाही.<br>त्यांच्या विहिरीमध्ये जो पाण्याचा पाझर होत आहे जे काही डिपॉजिशन होत आहे, सेडीमेनटेशन होत आहे त्याचा करीता जे पिंटस आहे. | **समिती सदस्या यांनी प्रकल्प प्रवर्तकास विचारणा केली की** - सी. एस. आर. च्या त्यांची समस्या जर का आपण दुर करत असु त्या विषयी आपण सांगावे.<br>त्यामुळे गढुळ पाणी येते तर ही खरच समस्या आहे का ? आणि असल्यास त्यावर आपण उपाययोजना करु शकतो का ? या विषयी पाहणे.<br>**समन्वयक यांनी प्रकल्प प्रवर्तकास विचारणा केली की** – जो मुददा उपस्थित केला आहे त्यामध्ये जे उत्खनन झालेल क्षेत्र आहे ते या पुर्वी उत्खनन केल आहे का ? तसेच या प्रस्तावित प्रकल्पाशी त्याचा काही संबंध आहे का हा माझा प्रश्न आहे.<br>व त्याकरीता काही उपाय योजना करणार आहे का ? व आपल्याकडे एसटीपीचा काही प्रस्ताव आहे का ? |

| | | | |
|---|---|---|---|
| | | एसटीपी आहे ईटीपी वर्कशॉप करीता प्रस्ताव आहे आणि त्यांच्या पिंटस मधुन जे पाणी पाझरणार आहे जे ग्राउंड वॉटर मधुन त्याच्या विहीरी सुदधा स्वच्छ करुन देऊ. आणि जे पाणी मध्ये सिंडस जमा झाले आहे ते सिंड सुदधा काढुन घेऊ. हा जो क्षेत्र आहे ४४ हेक्टर पैकी जे ४४ हेक्टर आहे त्यापैकी ४४ हेक्टर मध्ये खाण काम होणार नाही आहे जसे की आपल्याला एका टेबलमध्ये दाखवल होत फक्त ३.५ हेक्टर मध्ये एक्सवेशन होणार आहे आणि हे एक्सावेशन हायवे रोड पासुन ही दुर आहे आणि वहीवाटी पासुन ही दुर आहे आणि याला बेसिक करणार आहे लोकांच्या ये जाण्यावर कोणताही परीणाम होणार नाही याची तरतुद करुनच हा प्रकल्प बनविणार आहे. | |
| २ | **ग्रामस्थ, पारशिवनी, जि. नागपुर यांनी असा मुददा उपस्थित केला की -** रस्त्यावर पुढे दोन फुटचा नाला आहे व त्यामध्ये पाणी वाहत असते. चिखल झाल्यामुळे येण्या जाण्याच्या रस्त्यावर चिखल होतो आणि आम्ही खदानितुन जात होता आता खदान चालु झाल्यावर तेही बंद होईल तुमच्या कामामुळे तोही रस्ता बंद होईल थोडासा हा खालचा रस्ता आहे २०० मिटरवर वर गडडा आहे त्याच्यातुन खदानीचा पाणी वाहते आणि त्यामुळे आमचा जाण्या येण्याचा रस्ता विसकळीत होते चिखल होते, विस्कळीत होते पहीले आम्ही खदानीतुन जात होतो आता खदान चालु झाल्यावर तुमच्या गाडया चालु होतील आणि तिथुन जाऊ शकत नाही म्हणुन आम्हाला | **प्रकल्प प्रवर्तकाने यांनी सांगितले की -** हा खाण मधला प्रकल्प आहे आणि ही जी खदान आहे आणि त्याचे जे उत्पादन आहे ते २९७३७ टन/वर्ष आहे. म्हणजे एवरेज फक्त ९९ टन/दिवस उत्पादन राहणार आहे, आणि याच्यातुन ट्रकची जी वाहतुक आहे ती फक्त १० ट्रक असणार आहे. या व्यतिरीक्त बाकीचे जे वेहीकल मुमेंट आहे त्यामध्ये ऑफीस वेहीकल आहेत असे एकुण १५ वेहीकल दररोज या प्रकल्पामुळे ये जा करतील तरी कृपया करुन आपण या प्रकल्पाची मोठया प्रकल्पाशी तुलना कराल तर अस नाही आहे. हा छोटा प्रकल्प आहे ते फक्त ९९ टन प्रति दिवस एवढाच मॅगनिज बाहेर जाणार आहे बाकीचा जो ओवर बरडन आहे तो लिज एरीयामध्येच राखुन ठेवणार आहे. | -- |

| | | | |
|---|---|---|---|
| | इथे पुल बांधुन दयावे आणि आम्ही इकडुनच जाऊ अशी त्यांनी शिफारस केली. | | |
| ३ | **श्री. गुरुदयाल कांबळे, उपसरपंच, गाव पालोरा, ता. पारशिवनी, जि. नागपुर यांनी पुन्हा असा मुददा उपस्थित केला की -**<br>पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्याकरीता तुम्ही आम्हाला आरो फीलटर वगैरे अव्हेलेबल करुन दया. आमच्या कडे जी लोकसंख्या आहे त्या हिशोबानी तुम्ही दोन ते तीन आरो फीलटर जे काही शक्य होतील ते तुम्हाला करावे लागेल म्हणजे खाण सुरु होण्याच्या आधी आम्हाला करुन दया. | **प्रकल्प प्रवर्तकाने यांनी असे आश्वासीत केले की -**<br>सी.एस.आर. च्या फंडमधुन आम्ही करुन देऊ आणि त्याकडे लक्ष ठेऊ.<br>आपण जो प्रश्न उपस्थित केला आणि खरोखर एक चांगला लोकप्रतिनिधीच्या माध्यमातुन ज्या कास्तकारांने सांगितले की, आम्हाला इथे पुल पाहिजे तर ओव्हर बर्डनच्या जो काही मटेरीअल निघेल त्यानी तो रस्ता व्यवस्थित करण्याचा एक चांगला पांदण टाईप रस्ता व्यवस्थित करुन शेताकडे कसे जाईल कारण कास्तकाराची बोंब प्रकल्प सुरु असतांना रोजची नसावी ते कायम स्वरुपी चांगली राहावी हा आमचा प्रयत्न राहणार आहे.<br>दुसरा प्रश्न आपण ज्या ठिकाणी आरोची मागणी केली आहे नक्कीच आम्ही याठीकाणी आरो देणार आहोत कारण जी विहीर डिस्चार्ज होत आहे आणि जे पाणी गढुळ होत आहे तर आमची सुदधा एक प्रकल्पकाच्या दृष्टीने बांधीलकी आहे, आणि आम्ही ती बांधीलकी पुर्ण करु. | -- |
| ४ | **श्री. गुरुदयाल कांबळे, उपसरपंच, गाव पालोरा, ता. पारशिवनी, जि. नागपुर यांनी पुन्हा असा मुददा उपस्थित केला की -**<br>खाणीच्या अजुबाजुला जी शेती आहे तर त्या शेत मालाला डस्ट चा प्राब्लेम होणार आहे.<br>ब्लासटींगसाठी प्रॉब्लम होणार आहे त्याचा आवाज जितका कमी करता येईल तितका आणि या आधीची खाण सुरु होती १५ वर्षाआधी आम्हाला तो अनुभव आहे तेव्हा | **प्रकल्प प्रवर्तकाने यांनी प्रतिक्रिया व्यक्त केले की —** शेत मालावर धुळीचा प्रभाव होऊन नये म्हणुन त्याकरीता डस्ट सप्रेशनची बसविण्यात येणार आहे आणि वाहतुक जी आहे टारपोलीन कव्हर करुनच करणार आहोत.<br>आता जी नवीन टेकनॉलॉजी आली आहे इलेक्ट्रीकल डीपॉजीटरची टेकनॉलॉजी आहे याच्या मध्ये ब्लास्ट जो आहे एका झटक्यामध्ये होत नाही पण जीतके जे | |

| | | | |
|---|---|---|---|
| | आम्ही छोटे होतो आणि ब्लास्टचा आवाज गावापर्यंत यायचा त्यामुळे कोणच्या भिंती तळ जाण्याची भिती असते. कारण सामान्य माणुस आपल्या घरात हे वारंवार नाही करु शकत नाहीतर भरपाई दयावी.<br>आणि सी. एस. आर. फंड मार्फत आम्हाला वृक्षारोपण, वृक्ष वगैरे लागेल तर आपल्या मार्फत आम्हाला तर पुन्हा ट्री गार्ड वगैरे आहे. ॲडाप्ट म्हणुन पालोरा गावाला दत्तक घेऊन त्याकडे हे काम देण्यात यावे आणि महत्वाचे म्हणजे स्थानिक लोकांना रोजगार मिळेल. | होल्स आहे ते सीकवेन्स नी होते. आणि खाणीमध्ये व गावामध्ये अंतर खुप आहे. त्या लोकांचा परस्पर बाकी जे आहे टॅंकर लावणे आहे. कुठले ट्रक असतील त्यावर क्लीनर असणे असे तुमच्या भागातील काही स्कील वर्ग असेल ज्यांना करता येत असेल आणि खरोखर आणि त्यांना कामाची गरज असेल नक्कीच त्यांना आपण इन करु. बाहेरुन लोक इथे आणण्यापेक्षा इथलेच लोक जर भेटले तर इथेच ते प्राजेक्टसाठी आणि प्राजेक्टच्या व गावाच्या हितासाठी चांगली बाब आहे. आणि झाडे लावणे वृक्षारोपण लावणे दरवर्षी आपण हा प्रोग्राम राबवु आपण जेवढे झाडे मागवाल तेवढे झाडे आपण मागवु असे सांगितले. | |
| ५ | **ग्रामपंचायत पिपला, सरपंच पारशिवनी, जि. नागपुर यांनी असा मुददा उपस्थित केला की -**<br>आपल्या प्रस्तावित खाण कामामुळे बाजुच्या गावाला कोणत्याही प्रकारचा त्रास नाही व्हायला पाहिजे याची काळजी घ्यावी. | **प्रकल्प प्रवर्तकाने यांनी सहमती दर्शवली की -** असे करण्यात येईल. | |
| ६ | | **प्रकल्प प्रवर्तकाने यांनी असे सांगितले की —**<br>सर ई आय ए इ एम पी मध्ये पुर्ण माहिती दिलेली आहे त्या रीपोर्ट मध्ये पुर्ण प्रेसेनटेशन आहे.<br>ई आय ए इ एम पी मध्ये पुर्ण सांगितलेल आहे आणि प्रसेनटेशन मध्ये पुर्ण दाखविल आहे.<br>८० % आपण प्रिकॉर केलच आहे आणि रीमेंनींग २० % आमची प्लानींग पुढील येणाऱ्या ५ वर्षासाठी आम्ही हळुहळु प्लानींग करणार आहोत. | **समन्वयक यांनी असे निदर्शनास आणले की -**<br>ई आय ए इ एम पी मध्ये गट क्र. लिहिलेला नाही टोपो ग्राफी, टोपो शीट क्र. सांगितला पण त्याची कॉपी दिलेली नाही.<br>त्यामध्ये सरकारी, खाजगी आणि स्वत: मालकीची शेती हस्तातरीत आहे किंवा व्हायची आहे याबाबत विचारणा केली. प्रजेनटेशन दाखवा, आणि रेपटीफाय करा. ते पण सांगा की तुम्ही कुठे मेंशन केल आहे आणि थोड डिटेलमध्ये सांगा. |
| ७ | **ग्रामस्थ पालोरा, यांनी असा मुददा उपस्थित केला की -** | **प्रकल्प प्रवर्तकाने यांनी असे सांगितले की —** | |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रस्तावित जमिन आहे तुम्ही लॅड अ‍ॅक्वीजीशन अजुन काही जमिनीच व्हायच आहे त्यांना आपण नोटीस दिल्या आहेत का, त्याची मंजुरी आहे का ?<br>How could be possible to without land acvisition to excutiing the project.<br>म्हणजे तुमच लॅण्ड अ‍ॅक्वीजीशन अजुन कम्प्लींट झालेल नाही आहे. म्हणजे तुमची जेवढी लॅड अ‍ॅक्वीजीशन झाली आहे तेवढयाच जागेतच आपण ,खाणकाम करणार आहात का ?<br>व पुढे प्रश्न उपस्थित केला की पालोरा ते घोगरा महादेव जो पांदण रस्ता आहे त्याचा काम काही ठिकाणी थांबल आहे आणि काही ठिकाणी चालु आहे तर तो पांदण रस्ता तुमच्या लॅड मध्ये जात आहे. तर मग तो रस्ता बंद होणार आहे का ? कारण बहुतांश लोकांच्या शेती आहे त्या परीसरात आहेत. | लॅड अ‍ॅक्वीजीशन हा मुददा नंतर येतो, पहिले वाटाघाटीपेक्षा एन ए आर च्या अ‍ॅक्ट प्रमाणे जाणार आहे.<br>To execute the project it is possible if they willing person to holding the land & it is ready to sale the land directly.<br>लॅड अ‍ॅक्वीजीशन २००३ एल ए आर आय अ‍ॅक्ट जो आहे तो अ‍ॅक्ट जर वाटा घाटी तेज होण्याकरीता तर एखादा कास्तकाराला किंवा एखादया व्यक्तीला ते मान्य नसेल तर लॅड अ‍ॅक्वीजीशन प्लानला पुढे जाव लागेल पण मिनीमम जे आहे ते अ‍ॅक्वीजीशन अ‍ॅक्ट जे काही निकष आहे ते आम्ही मान्य करु आणि एक अजुन सांगु इच्छितो की, हा प्रकल्प साहेब म्हणजे याचा जी मिटींग झाली होती त्यावेळेस पाहिले जेव्हा याच अ‍ॅक्वीजीशन दर होत ने जवळपास या गोष्टीला जवळपास ४ वर्ष झाले अनेक प्रकारचे एनोसी घेण्याचे आले आहे. आणि त्याच्यामध्ये वेगवेगळया लेवलवर एनओसी घेतली आहे. तेव्हा लागणारा वेळ याच्यात किंवा यापुर्वी लॅड अ‍ॅक्वीजीशन करण्याकरीता लॅड ओनर्सकडे आपण जाण्यात आलेला नाही कारण हे आहे की, ४ वर्षामध्ये काही जे वाटाघाटी झाले असणार कदाचित आजच्या तारखेमध्ये आपण बोलु तर आज ते मान्य झाल नसत म्हणुन जो पर्यंत आपल्याला पुर्ण सत्य सगळया प्रकल्पाच्या पुर्ण मान्यता मिळत नाही तोपर्यत आपण या प्रकल्पाला म्हणजे लॅड अ‍ॅक्वीजीशन किंवा लॅड शी रीलेटेड डिसकशन अजुन होल्ड केलेल आहे. अजुनही आता जे आपण जवळपास अंतीम टप्प्यावर आलेलो आहे त्याविषयी | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मान्यता मिळाल्यानंतर त्यामध्ये दोन गोष्टी महत्वाच्या आहे म्हणजे पोल्युशन कंट्रोल बोर्डाकडुन कन्सेट मिळते आणि लॅड ॲक्वीजीशन करीता ही आपण आता जवळपास ५४ % ही पुर्ण प्रक्रिया कम्प्लिट केलेली आहे. गेल्या ४ वर्षामध्ये आणि अनफॉच्युनेटली त्या पिरेडमध्ये आपल्याला कोराना पिरेडचा १ वर्षाचा सामना कराव लागला त्यामुळे थोडा डिले झाला. हो लॅड ॲक्वीजीशन कम्प्लिट झालेला नाही आहे. ती प्रासेस हळुहळु सुरु आहे. हो लॅड ॲक्वीजीशन झाल आहे तेवढच करु. ज्या सरकारी पांदण त्या ठिकाणी मंजुर झालेल आहे आणि त्याची जी काही सरकारी पांदन ला जो नंबर असतो ती कुठल्याही जागा आपण ती हस्तातरीत करीत नाही आणि घेत पण नाही ती जशी आहे तशीच राहील आणि सरकारची जी पांदण जे कन्टयुन्युयस बांधकाम सुरु आहे आपण त्या प्रकारे त्यांना त्या पांदनवर सर्व कास्तकार आरामशील चालेल, पुन्हा आपण त्यांना जी मदत करता येत असेल तर वेळोवेळी मदत करता येईल जशी जागा मिळेल किंवा दगड मिळेल तर चांगली पांदण बनविण्याचा प्रयत्न करु. | |
| ८ | **श्री. संजय सत्यकार, पत्रकार, कन्हान यांनी असे सुचविले की -** सदर प्रस्तावास आमचा विरोध नाही. प्रकल्प धारक जे प्रस्तावित १२-१३ हजार वृक्षारोपण करणार आहात ते महिला बचत गटाच्या माध्यमातुन करण्यात यावी.<br>तसेच जे खाणकाम करतांना ओव्हर बर्डन निघाणार आहे त्याची विल्हेवाट करतांना गावातील शेतजमिनीकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावर टाकण्याकरीता करण्यात यावा. | **प्रकल्प प्रवर्तकाने यांनी असे सांगितले की –**<br>जी आमची नवीन टीम आहे, टीमला कुठेतरी चांगल काम करायच त्याचा जो काही मानस आहे. प्रोत्साहन केले त्याबददल त्यांनी समर्थन व्यक्त केले. दिलेल्या सुचना, पाण्याच्या महत्वाविषयी जे सांगितले की जे पाणी खोदाई करु त्यासाठी आम्ही गाववाल्यासोबत राहुन एक जॉइंट सर्व्हे करु घेऊ की शेतीच्या बाजुला कुठे नहर वगैरे आहे का, नहर | |

| | | | |
|---|---|---|---|
| | खदान किती खोलीपर्यंत खोदणार आहे हे सांगावे व जे खोदकाम करतांना निघणारे खाणीतील पाण्याचा वापर परीसरातील शेतकऱ्यांच्या सिंचनाकरीता व वापरण्याकरीता देण्यास हरकत नसावी.<br>स्थानिक लोकांना रोजगार, प्रशिक्षण व प्राधान्य देण्यात यावे. | आपल्याला चांस करता येईल का, हा महत्वाचा मुददा आहे त्यामध्ये कृषी विभागाची व एरीगेशन डीपारमेंटची जी काही शासनाची, डिपांरमेंटची मदत घेऊ. डिवॉटरींग चे पाणी आपल्याला कुठेना कुठे नदीमध्ये टाकावे लागेल ते कुठे वेस्ट पाणी होईल तेच जर शेतकऱ्यांना उपयोगात आल आणि त्यांच्या फळबागा जमिनीतुन त्यांना दोन तीनही पिक घेता आहे त्या दृष्टीकोनातुन चांगला सुजाव संजयजीनी या ठिकाणी केला. खरोखर गावाच्या हिताची चांगली मांगणी या ठिकाणी केली. दुसरा विषय असा होता की, बचत गटाला सोबत घेऊन वृक्षारोपण करु व आमच म्हणण असे आहे की, इथे कोणती छोटी मोठी कॅंटीन राहील किंवा कुठला खाणवळ सुदधा तर लेबर येण ड्रायव्हर जाण ते सुदधा काम आम्ही बचत गटाला देऊ त्या गावाच्या दोन तीन महिला बचत गटाला यश दृष्टीने त्यांना रोजगार मिळेल व त्याच्या मुलाबाळाला व परीवाराला मदत होईलव सोयीचे होईल. पर्यावरणासाठी आम्ही गाव पातळीवर एक समिती गठित करणार आहोत कारण आम्ही नवीन लोक आहोत. बरच काही इथे संमजुन गावकऱ्यांना सोबत घेऊन काम कल तर नक्कीच हा प्रोजेक्ट समोर जाईल आणि वेळोवेळी सुचना आपण दोन तीन महिन्यात सभा घेऊन आपसामध्ये बसुन ग्रामपंचायत कार्यालयामध्ये आमचे स्टाफचे काही लोक राहतील आम्हीपण राहु अशा पद्रधतीने सोबत राहुन आपण सर्वाना लॉगटाईम मेंटेनसच बचत गटाला दिल तर त्यासुदधा आर्थिक दृष्टीने सक्षम होतील. ओव्हर बर्डनला शासनाची मंजुरी घ्यावी लागते कारण कार्यक्षेत्राच्या बाहेर | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आपण ओव्हर बर्डन नेऊ शकत नाही पण काही मोठमोठे दगड असतात तर कार्यक्षेत्राच्या आतमध्ये पांदन चालली आहे ती पांदन मजबुत करता येईल का जेसीबी नी त्यात दगड टाकुन असुन जास्त कास्तकाऱ्यांना जाण्याचे अधिक सोईचे होईल का. जस एक बोलला की या ठिकाणी पुल बांधायला पाहीजे. पुलाच्या ठिकाणी दगड टाकुन सोयीच होईल का जायला. त्यांना बैलबंडी घेऊन जायच आहे शेतीत किंवा माल आणायचा आहे आणि स्थानिक रोजगार जे आम्ही पहिले पण बोल्लो आताही सांगतो की गावाच्या मरजीच्या शिवाय प्रकल्प चांगला चालवु शकत नाही. सुशांततेत चालवु शकत नाही हे नक्की आहे म्हणुन गेलेल्या सुचनांचे आपण नक्की पालन करु. | |
| ९ | | | **अध्यक्ष, लोकसुनावणी समिती तथा अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी यांनी असे सुचिविले की –** पारशिवनी परीसरातील जे सर्व लोकप्रतिनीधी आहेत खर तर जे या गावचे जबाबदार नागरीक आणि या प्रोजेक्टचे प्रवर्तक तसेच सर्व अधिकारी वर्ग आता जे बेसिकली जी समिती आहे त्याच काम अस होत की, या सुनावणी दरम्यान कुठल्याही इंन्वारमेंटचे जे इफेक्ट आहे पर्यावरणावर जो प्रभाव पडणार आहे त्यानंतर जे गाव आहे आजुबाजुचे त्यांचा समाज जिवनावर जो प्रभाव पडणार आहे त्याचा जो फिड बॅक आहे तो नागरीकांकडुन येतो तो तसाच्या तसा आपल्या इ आय सी मध्ये त्यांच्या पर्यंत पोहोचविने आता इथे आल्यानंतर बरेच सजेशन आल्या त्या सजेशन सुदधा आम्ही या रीपोर्ट मध्ये |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आम्ही इनकारपोरेट करु याच्या त्या व्यक्तीरीत समिती कार्य क्षेत्राबाहेर जाऊन जे बोलण आवश्यक आहे. माझ सगळयात पहिले प्रवर्तक जे आहे त्यांना एक विनंती आहे ती एक फार सुंदर पुस्तक आहे विश्वास पाटील रायटर आहे झाड झडतील म्हणुन तुम्ही वाचल पाहिजे. एखादा प्राजेक्ट ज्यावेळी होतो तेव्हा त्यावेळेचा त्या ग्रामीण जिवनावर व त्या समाजावर कोणत्या लेवल पर्यंत परीणाम होतो हे आपल्या लक्षात येते. त्या सर्व गोष्टी जाणुन घ्यायच्या असतील तर ते पुस्तक वाचुन आपण त्या पदधतीने प्रोजेक्ट उभे करु शकतो. सगळयात पहिले १९७६ ला शाश्वत विकासाचे जे कॉनसेप्ट मांडले गेले आहे त्यावरुनच जो हा आजचा उपक्रम आहे तो म्हणजे अस्तित्वात आला असे म्हणायला हरकत नाही. जर समजा विकास करायचा आहे तर तो शाश्वत असला पाहिजे त्याचा असा परीणाम होऊ नये की कुठल तरी ग्रामीण जीवन किंवा कुठलतरी गाव किंवा कोणाचे तरी आयुष्य उदधवस्त व्हावे त्यामुळे या सगळया कॉन्सेप्ट आल्या. आजचा जो विषय आहे त्या एंगल नी जर विचार केला तर प्राजेक्ट झाला, प्रोजेक्ट होत असतांना सर्व जे प्राजेक्टचे प्रवर्तक आहे त्यांनी आवश्वासन दिली तर ही आश्वासने लॉग टाईम पर्यंत जो पर्यंत तुमचा प्राजेक्ट अस्तित्वात आहे तो पर्यंत तुम्ही आपल्या गावातील लोकांच्या लोकप्रतिनिधी असतील, गावातील नागरीक असतील त्याच्या सोबत कोऑरडीनेशन ठेऊन त्याच्या ज्या काही अडचणी आहेत, ज्या काही तक्रार करतात या ॲगलनी विचार न |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | करता त्याचा खरोखर त्याच्या आयुष्यावर परीणाम होत आहे का याचाही विचार करुन त्याचे जे सोल्युशन्स जे आहे ते काढले पाहिजे. याला जर विकास म्हटल तर काही अडचणी येणारच नाही. आपण कुठल्याही पर्यावरणाचा जस आजच सर्कल आहे असच अस कधी राहणार नाही. पण जेवढा मिनीमम आपल्याला पर्यावरण इफेक्ट करता येईल. तेवढा आपल्याला अभ्यास करायला पाहिजे. म्हणजे तुम्ही प्राजेक्ट उभारत असतांना काही जे एक्सपर्ट व्यक्ती असतील इंन्वारमेंटचे जे काम करणारे त्याकडुन सल्ला घ्यायला पाहिजे. गावातील जे स्थानिक लोक असतात यांच ज्ञान आपल्या पेक्षा त्या क्षेत्राच्या बाबतीत बरेचदा जास्त असतात त्याची सुदधा मदत आपण घेतली पाहिजे आणि या सगळया गोष्टीचा असेसमेंट करुत जो प्राजेक्ट उभारत असतांना त्या पर्यावरणावर आघात होणार आहे. त्यात जे आघात मुल्याकन आहे. जितक कमी करता येईल तितका कमी करण्याचा या सर्व प्रक्रियेमध्ये आपण प्रयत्न करणार आहोत. यासोबतच इथल जे समाज जिवन आहे या समाज जिवनाचे जे अर्थकारण आहे ते अर्थकारण टोटली एखाद गाव पाहुन शेतीवर अवलंबुन आहे शेतकऱ्याजवळ जे उत्पन्न येतो त्याच उत्पन्नातुन कुठेतरी शेत मजुरी दिली जाते. बाहेरचा पैसा या गावामध्ये येत नसतो. फार जे चार ते पाच लोक जे नोकरीवर असतील त्यांचेच पैसे फक्त येतात. तुमच्या प्रोजेक्ट मुळे या गावाचे अर्थकारण ही बदलण्यास मदत होईल अशी ही अपेक्षा या जन सुनावणीच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | मार्फत अॅज अ अॅडीशनल डिस्ट्रीक मॅजीसट्रेड म्हणुन माझी सुदधा राहील. कारण इथे जे छोटे छोटे जॉब असतात जे ड्रायव्हर्स असतील, क्लिनर असतील, मेकॅनिक असतील यांना सुदधा तुम्ही यांना जॉब दिले पाहिजे. त्यांच्यात जर समजा स्किल नसल ते स्किल डेव्हलप करण्यासाठी सुदधा तुमच्या प्राजेक्ट प्रवर्तकाकडुन प्रयत्न झाले पाहिजे. मानुस मिळते नाही म्हणुन कोणत्या बाहेरील गावातुन माणुस इथे आणुन त्याला रोजगार देण अस अपेक्षीत नाही. ज्याआधी इथल नॅच्युरल रीसोरसेस आपण वापरतो आहे तर आपली जबाबदारी आहे याच भागाला बेनिफिट झाले पाहिजे. या सगळया गोष्टी तुमच्या कडुन होणे अपेक्षित आहे. समितीचा अध्यक्ष या नात्याने विचारणा केली की कोणाला अजुन या बाबतीत काही नोंदवायच आहे किंवा कुठली शंका उपस्थित करायची आहे तर हे फोरम ओपन आहे. तुम्ही यानंतर ही एक दोन दिवस रीपोट दयायला लागतील आणि जर आपल्या वाटत असेल एखादी लेखी आपण कलेक्टर ऑफीस किंवा एम. पी. सी. बी. ऑफीसला सुदधा आपण निवेदन उपलब्ध करुन दिली तर आम्ही ते रेकॉर्ड वर घेऊ. अजुन कोणाला काही बोलायच आहे का, नाही तर आपल्या सर्वांना आश्वासन देतो की, यांच्या ज्या छोटया शंका आहे त्या त्याच वेळी याच समाधान केल पाहिजे. तुम्ही त्याच वेळी समाधान केल तर पुढे जे प्रॉब्लेम असतात ते तेवढे पॅनिक होत नाही. ठिक आहे त्यांना सर्व्हे नं. जी स्लाईट आहे त्याची प्रिट आऊट देऊन दया. आपण सर्व आले त्याचे आभार पुन्हा एकदा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | प्रवर्तकाना एवढीच सुचना आहे की, त्यांनी प्रोजेक्ट करत असतांना खरोखरच एक आयडील उदाहरण त्यांनी सेटप केल पाहिजे. |
| १० | **ग्रामस्थ पारशिवनी यांनी असे सुचविले की -** सुनावणी केली तर आम्हाला माहितच नव्हत. नोटीस किंवा पुर्व सुचना दिलेली नाही. ४४ हेक्टर जी जमिन आहे ते क्षेत्र ते कुठ पाहायला मिळेल. | **प्रकल्प प्रवर्तकाने यांनी असे सांगितले की —** याची पुर्वसुचना दिली आहे आणि पोल्युशन कंट्रोल बोर्डातर्फे सर्व ग्रामपंचातमध्ये नोटीस लावण्यात आले आहे आणि याच्या बददल सर्व रीपोर्टस पण ठेवण्यात आले आहे. | |

मा. अध्यक्ष तथा अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, पर्यावरण लोकसुनावणी समिती यांनी समारोप प्रसंगी आपल्या अभिप्रायात असे नमुद केले की, लोकसुनावणीच्या वेळी उपस्थित केलेले सर्व मुद्दे जसेच्या तसे लोकसुनावनीच्या इतीवृत्तांतामध्ये समाविष्ट करून पुढील योग्य त्या कार्यवाही करीता सदरचा अहवाल पर्यावरण मंत्रालय, महाराष्ट्र शासन हयांना सादर करण्यात येईल.

त्यांनतर आभार प्रदर्शन होऊन लोकसुनावणी पुर्ण झाल्याचे घोषित केले.

**(हेमा देशपांडे)**
सदस्य लोकसुनावणी समिती
तथा प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, नागपुर

**(रा. ज. पाटील)**
समन्वयक लोकसुनावणी समिती
तथा उप प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, नागपुर -१

**(अनुप खांडे)**
अध्यक्ष, लोकसुनावणी समिती
तथा अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, नागपुर.